आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in






# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १४३ वा ● गुरुवार दि. ३१ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## छाननीनंतर २८७ मतदारसंघात ७ हजार ०५० उमेदवारांचे अर्ज वैध

मुंबई, : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि.२९ ऑक्टोबर २०२४ रोजीपर्यंत राज्यातील २८८ मतदारसंघांसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याचा अखेरच्या दिवसापर्यंत ७ हजार ९९५ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल झाले होते. या नामनिर्देशन पत्रांची दि. ३० ऑक्टोबर रोजी छाननी करण्यात आली. राज्यातील २८७ मतदारसंघातील एकूण ७ हजार ९६७ उमेदवारांपैकी ७ हजार ०५० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत, तर ९१७ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत.

५६ – नागपूर पश्र्िचम विधानसभा मतदारसंघात २७ उमेदवारांपैकी २२ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले तर ०४ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. या मतदारसंघातील एका उमेदवाराच्या अर्जाची छाननी ( ३१ ऑक्टोबर) पुढे ढकलण्यात आली आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

## झरोका

एक – बंडखोरीला उधाण,विकासाचे काय असेच मतदार म्हणत आहेत, त्यामूळे डोकं बधीर झालं आहे, हे कळतच नाही.

दुसरा – अरे, लोकशाही मध्ये एकमेकाच्या विरोधा मध्ये निवडणूकीत उभा राहाणे किंवा उत्तर प्रतिउत्तर देणे हे न्यायीक लक्षण असते. त्यामुळे तू कशाला चिंता करतोस.

एक – अरे, बंडखोरी हे लोकशाहीतील एक हक्कात्मक दंड आहे. भाजपा मध्ये बंडखोरी होते, शिंदे, अजित पवारांच्या पक्षा मध्ये बंडखोरी होते, त्याच प्रमाणे महाविकास आघाडीतील तमाम घटक पक्षात बंडखोरीला उधाण आले असेल तर तू कशाला चिंता करतोस.

दुसरा – अरे, हि बाब साधीसोपी असली तरी राजकीय दृष्ट्या न्यायीक हक्काला दगाबाजी ठरते, त्यामूळे जे कोणी मैत्रीपूर्ण लढत असेल असे म्हणत असतील तर त्यावरुन संशय घेण्याचे कांही कारण नसावे असे का वाटू नये.

एक – अहो, आजघडीला महायुतीतील तीन, चार जागावर मैत्रीपूर्ण लढत आहे, वंचितचे धोरण वेगळे आहे, महाविकास आघाडीने अनिल देशमूख यांना डावलून त्यांच्या मुलाला उमेदवारी दिली. ठाकरे गटाच्या तीन जिल्हा प्रमुखाची विदर्भातून हाकालपट्टी केली, हे कशाचे धोतक असावे, हे काही कळतच नाही.

दुसरा – अरे, घर फोडण्याचे पाप कधी केले नाही, असे शरद पवार म्हणीत असताना शरद पवार यांचे पुतणे अजित पवार हे कांगावा करुन सत्ताबाजारात दिवंगत आर. आर. पाटील यानी केसाने गळा कापला म्हणतात, असे ही म्हणतात परंतू सत्तेच्या लालचेपोटी शरद पवाराला लंगडे करण्याचे प्रयत्न अजित पवार यांनी केले. ते त्यांना कसे काय कळत नसावे, अशी शंका वाटते..

एक – अरे, राजकारणात बेरीज वजाबाकी होत असते, त्यामूळे सगेसोयरे नात्यांचे कांहीच बंधन नसते, अख्खी हायात घातलेल्या शिवराज पाटील यांच्या सुनबाई या भाजपाकडून विधानसभेच्या निवडणूकीत रिंगणात असताना शरद पवार आणि अजित पवाराबद्दल बोलण्याचे कारणच काय.

दुसरा – अरे, बंडखोरीला उधाण आहे, विकासाचे काय, असे तू म्हणतोस परंतू महाराष्ट्राच्या राजकारणात बंडखोरीशिवाय दुसरा पर्याय नाही, कारण असे की, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचाराला तडा देवून हिंसकरितीने मुस्लिम, मराठा सत्ताकारणाच्या नादातून जे कांही घडते आहे, ते आजघडीला सहण करण्याशिवाय पर्याय नसावा हे वास्तव्य दिसते.

## सत्तेच्या बेरजेच्या राजकारणात लातूरच्या राजकारणावर लक्षवेधी चर्चा ?

लातूर (दैलाप्रप्र) : महाराष्ट्राच्या राजकारणात मराडवाड्यातील लातूर शहर आणि जिल्ह्यामध्ये बेरजेच्या राजकारणातून कॉंग्रेस आणि भाजपाच्या माध्यमातून इतर पक्षाच्या सहकार्याने सत्ताकारण केले जाते. ही वस्तूस्थिती असली तरी आजघडीला लातूर जिल्ह्यातील सत्ताकारणातील बेरजेचे गणित धोकादायक ठरते आहे. अशी राजकीय वर्तूळात कुजबूज होताना दिसते आहे.

निलंगा विधानसभा मतदार संघाचा विचार केला तर, भाजपा, शिवसेनेचे जुने हितसंबंध असलेले भाजपाचे एक संभाजी पाटील निलंगेकर तर त्यांच्या विरोधातील तत्कालीन शिवसेनेचे जिल्हा प्रमुख असलेले कॉंग्रेस नेते अभय सांळुके हे विधानसभा निवडणूकीच्या रिंगणात आहेत. मग चितपट कोणाची भाजपाचीच हे दुरापास्त ठरु नये हे वास्तव वाटते.

औसा विधानसभा मतदार संघाचा विचार केला तर विद्यमान आमदार अभिमन्यु पवार हे भाजपाचे उमेदवार आहेत. तर प्रतिस्पर्धी कॉंग्रेसचे उमेदवार दिनकर माने हे तत्कालीन शिवसेनेचे प्रमुखच होते, आमदार होते, यातील गौडबंगाल



काय असावे हे कळेनासे वाटते. ही बाब प्रसार माध्यमाना अडगळीत टाकणारी असावी अशीच कुजबूज होताना दिसते आहे.

लातूर शहर विधानसभा आणि लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघा मध्ये कॉंग्रेसच्यावतीने सख्खे भाऊ लढत देत आहेत. त्यांच्या विरोधामध्ये विलासराव देशमूख आणि गोपीनाथराव मुंडे यांची मैत्री जपवणूक करुन अमित देशमूख यांच्या विरोधामध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या सर्वोच्च पदावर सत्ताकारण केलेल्या शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सुनबाई अर्चनाताई शैलेश पाटील चाकूरकर या उभ्या आहेत, तर लातूर ग्रामीण मधून धिरज देशमूख यांच्या विरोधात गोपीनाथ मुंडे यांचे शिष्य विधान परिषद सदस्य असलेले आमदार रमेश कराड यांना उमेदवारी देण्याचे कारण काय असावे, दुसरा कोणी लायक नाही काय, अशी ही कुजबूज होत असली तरी ॲड. बळवंत जाधव यांची रणनीती उद्याचालून यशस्वी ठरते की काय, अशी ही कुजबूज राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

उदगीर–जळकोट विधानसभा मतदार संघात महायुतीच्या वतीने विद्यमान मंत्री संजय बनसोडे यांना तिकीट दिले. परंतू मुळातच भाजपाचेच असलेले माजी आमदार सुधाकर भालेराव यांना महाविकास आघाडीतून तिकीट दिल्यामूळे सत्तेच्या सापसिडीच्या खेळा मध्ये कोणाचे राजकारण यशस्वी किंवा अयशस्वी होईल हे सांगता येण्यासाठी नसावे. त्यातच अहमदपूर विधानसभा मतदार संघा मध्ये मुळचा कॉंग्रेस चेहरा असलेले बाबासाहेब पाटील हे अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून दुसऱ्यांदा उमेदवार आहेत, त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने हर घडीला विधानसभा निवडणूकी मध्ये चेहरा बदलून कधी कॉंग्रेस, कधी भाजपा, तर कधी राष्ट्रवादी असा चेहरा समोर ठेवून माकडचाळ करणाऱ्या माजी आमदार विनायक पाटील यांना शरद पवार गटाने महाविकास आघाडीतून उमेदवारी दिल्यामूळे लातूर जिल्ह्यातील महायुती, महाविकास आघाडीतील रागरंग कळेनासा वाटतो. अशी लोकभावना असताना ही, प्रसार माध्यमे उघडपणे कसे काय स्पष्टीकरण करीत नाहीत, असा संशय बळावताना दिसतो आहे.

## निवडणूक निरीक्षक प्रमोद कुमार मंडल यांची औराद शहाजनी चेक पोस्टला भेट

लातूर, : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांसाठी निवडणूक निरीक्षक (पोलीस) म्हणून पोलीस उपमहानिरीक्षक प्रमोद कुमार मंडल (आयपीएस बॅच २०१०) यांची नियुक्ती भारत निवडणूक आयोगाने केली आहे. २८ ऑक्टोबर रोजी त्यांचे जिल्ह्यात आगमन झाले असून त्यांनी आज औराद शहाजनी येथील चेकपोस्टची पाहणी केली. तत्पूर्वी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधिकारी यांची बैठक घेतली.



निवडणूक पोलीस निरीक्षक प्रमोद कुमार मंडल यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व इतर निवडणूक निरीक्षक यांची भेट घेवून विधानसभा निवडणूक प्रक्रिये संदर्भात चर्चा केली. तसेच ३० ऑक्टोबर रोजी दुपारी पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांची बैठक घेऊन आगामी काळातील विधानसभा निवडणूक कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासंदर्भात सूचना केल्या.

निवडणूक निरीक्षक प्रमोद कुमार मंडल यांनी महाराष्ट्र–कर्नाटक आंतरराज्य सीमा भागातील औराद शहाजानी येथील तपासणी नाका येथे अचानक भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. तसेच दुर्गम भागातील ठिकाणांना भेटी देऊन कायदा व सुव्यवस्था परिस्थितीचा आढावा घेतला.

लातूर जिल्ह्यातील विधानसभा मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणूक पोलीस निरीक्षक प्रमोद कुमार मंडल हे शासकीय विश्रामगृह, औसा रोड, लातूर येथे वास्तव्यास आहेत. निवडणूक प्रक्रिया तक्रारी संदर्भात मोबाईल क्रमांक ९३२२६६८६३० वर नागरिक त्यांच्याशी संपर्क करू शकतात.

## निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत १८७ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त

मुंबई, :– विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ते ३० ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण १८७ कोटी ८८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली.




निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या राज्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणांनी ही कामगिरी केली आहे. विविध ठिकाणी पोलीस विभाग आणि इतर यंत्रणांनी उभारलेले तपासणी नाके योग्य पध्दतीने कार्यरत असल्यामुळे हे यश मिळाले आहे.

यामध्ये प्रामुख्याने राज्य पोलीस विभागाने सुमारे ७५ कोटी रूपये, इन्कमटॅक्स विभागाने सुमारे ६० कोटी रूपये, राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुमारे ११ कोटी रूपये यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या 'सी–व्हिजील' पवर तक्रार करता येते. या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्याने आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे.

## अयोध्येत ५०० वर्षानंतर होणार दिवाळी साजरी!

आयोध्या : प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर यंदाच्या जानेवारी महिन्यात प्रभु श्री रामाची प्राणप्रतिष्ठा झाली. ५०० वर्षानंतर अयोध्येत नव्याने बांधलेल्या श्री रामजन्मभूमी मंदिरात मोठ्या थाटामाटात दिवाळी साजरी होणार आहे. अयोध्येमध्ये रामलल्ला यांच्या अभिषेकनंतर पहिल्यांदाच नव्या राम मंदिरात दिवाळी साजरी होणार आहे. यासाठी जय्यत तयारी सुरु असून शरयू काठी तब्बल २५ लाख दिवे लावले जाणार आहेत. त्याचबरोबर भगवंताचे पुष्पक विमानाने आगमन साकरण्यात येणार आहे. आज होणाऱ्या या दिपोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते होणार आहे. आज होणाऱ्या दीपोत्सवामध्ये अयोध्येत पर्यावरणपूरक फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येणार आहे. हे फटाके १२० ते ६०० फूट उंचीवर आकाशात उडणार आहेत. तसेच परिसरातील ५ किमीच्या अंतरावरून ते पाहता येणार आहेत. शरयू ब्रिजवर आज सायंकाळी फटाक्यासह लेझर शो, फ्लेम शो आणि संगीत कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. दिवाळी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाची सुरक्षा लक्षात घेता, अयोध्येत सुमारे १० हजार सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच राममंदिराकडे जाणारे सर्व रस्ते लोकांसाठी बंद करण्यात आले असून केवळ पासधारकांनाच प्रवेश दिला जाणार आहे. सुव्यवस्था राखण्यासाठी या मार्गावर पोलीस तैनात करण्यात येणार आहेत.

## नागपूरचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे संविधान चौकातील घटनेची लेखी तक्रार दाखल.

नागपूर : दीक्षाभूमि दक्षता समितीच्या शिष्टमंडळाने आज नागपूरचे निवडणूक निर्णय अधिकारी यांची भेट घेऊन राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकर्त्यांनी नागपूर येथील संविधान चौकामध्ये असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा परिसरामध्ये तोडफोड करून जय श्रीराम चे नारे लावले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मनिरपेक्ष संविधान दिले. त्यांच्यासमोर जय श्रीराम चे नारे लावून त्यांची विटंबना करणे म्हणजे अगण्य अपराध आहे. म्हणून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणे व संबंधितावर ट्रॉसिटी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करणे. इत्यादी विषयावर चर्चा झाली. या प्रसंगी दीक्षाभूमी दक्षता समितीचे अध्यक्ष माया उके, किशोर गेडाम, श्रीमती पौर्णिमा शेंडे, शोभाताई अंबादे, इतर पदाधिकारी उपस्थित होते.




## औसा मतदारसंघातील १२ तांड्याना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळवून देऊ - आ अभिमन्यू पवार

औसा – स्वतंत्र भारताच्या इतिहासानंतर कधीही जेवढा विकास निधी उपलब्ध झाला नाही तेवढा निधी या पाच वर्षांत उपलब्ध करून दिला या विकासाला गती देत असताना मतदारसंघातील तांडे, वस्ती व वाडी यांना विकासाशी जोडण्याचे काम प्राधान्याने केले आहे. मतदारसंघातील २७ तांड्याच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात आला असून यापैकी १२ तांड्याना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा येणाऱ्या काळात दिला जाणार आहे. एकंदरीत महायुतीच्या सरकारने लातूर जिल्ह्यातील तांडा विकासासाठी ७१ कोटींचा विकास आराखडा तयार केला असून येणाऱ्या काळात लातूर शहरात वसंतराव नाईक यांचा पुतळा उभारला जाणार असल्याची ग्वाही आमदार अभिमन्यू पवार यांनी दिली आहे.



विधानसभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर आयोजित बैठकीत ते औसा तांडा, खानापूर तांडा व बोरफळ तांडा येथे बोलत होते. याप्रसंगी डॉ गणपत राठोड, सचिन चव्हाण, महेश चव्हाण, विठ्ठल चव्हाण, सुभाष राठोड, बजरंग जमादार, चंदर राठोड,संभाजी सुरवसे, प्रकाश भार, किरण चव्हाण, संजय राठोड, नेताजी चव्हाण, वामन जाधव, अरुण चव्हाण, शरद राठोड आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी आ अभिमन्यू पवार बोलत होते की समाजाच्या समस्या व अडचणी मला माहित आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याच्या भूमिकेतून मी विधीमंडळात जनतेचे प्रश्र्न मांडून ते सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. आणि या पाच वर्षांत विकास काय असतो हे मी दाखवून दिले आहे.प्रत्येक तांड्यावर रस्ते, नाली, पाणीपुरवठा योजनेसाठी रोहित्री आदी कामासह मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर अधिक भर देण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून या समाजाची मागणी होती कि लातूर येथे वसंतराव नाईक यांचा पुतळा उभारला जावा म्हणून याबाबत आपण शासनाकडे पाठपुरावा करून विधीमंडळात मागणी केली त्या अनुषंगाने लातूर शहरात वसंतराव नाईक यांचा उभारणीसाठी जागा निश्र्चित करून घेण्यात आली असून लवकरच त्याठिकाणी पुतळा उभारला जाणार आहे.समाजाचा सन्मान म्हणून या सरकारने पोहरादेवी चे महंत बाबुसिंग महाराज यांना आमदार केले असून त्यांच्या माध्यमातून समाजाचे प्रश्र्न जाणून घेत ते सोडविण्याचे काम केले जाणार असल्याचे सांगून महायुतीच्या सरकारने मातृत्वाचा सन्मान केला आहे. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक आधार असल्याचे त्यांनी सांगितले..तांडा विकासाला गती देण्यासाठी आ अभिमन्यू पवारांना साथ द्या – डॉ गणपत राठोड यावेळी बोलताना डॉ गणपत राठोड म्हणाले की आतापर्यंत तांडा विकासाकडे कोणत्या आमदारांने फारसे लक्ष दिले नाही. त्यामुळे तांडा विकासाचा अनुशेष मोठा होता. मात्र या पाच वर्षांत आ अभिमन्यू पवार यांनी प्रत्येक तांडा विकासाला जोडण्याचे काम केले आहे. त्यामुळे तांडे विकासाकडे जाताना दिसत आहेत. तळागाळातील लोकांपर्यंत पोहचून प्रत्येकाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांचे काम कौतुकास्पद असून तांडा विकासाला गती देण्यासाठी आ अभिमन्यू पवारांना साथ देण्याचे आवाहन डॉ गणपत राठोड यांनी केले.

## धनगर समाजाला महायुतीच आरक्षण देणार - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा विश्र्वास

निलंगा/प्रतिनिधी:महायुती सरकारनेच धनगर समाजाचा सन्मान केला आहे. आरक्षणाचा प्रश्र्नही महायुती सरकारच निकाली काढेल. सरकार आल्यानंतर धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याचा निर्णय घेतला जाईल,असा विश्र्वास आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी दिलाश्र. वलांडी येथील संगमेश्र्वर मंगल कार्यालयात निलंगा मतदारसंघातील धनगर समाजाचा मेळावा बुधवारी संपन्न झाला.या मेळाव्यात मार्गदर्शन करताना आ.संभाजीराव पाटील निलंगेकर बोलत होते.मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार भोसले तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मेळाव्याच्या प्रारंभी अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.धनगर समाजाच्या वतीने काठी, घोंगडी व फेटा बांधून आ. निलंगेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की, मुघल सरकारने हिंदू संस्कृती मोडून काढली. ती जतन करण्याचे काम अहिल्यादेवी होळकर यांनी केले.स्वातंत्र्यानंतर ६० वर्षात कॉंग्रेसला त्यांचा सन्मान करता आला नाही.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचा योग्य तो सन्मान केला. राज्य सरकारनेही सोलापूर विद्यापीठाला अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिले तर अहमदनगरचे नाव बदलून ते अहिल्यानगर करण्यात आल्याचे आ. निलंगेकर म्हणाले.



शरद पवारांनी मधुकर पिचड यांना हाताशी धरून धनगर व धनगड असा तांत्रिक मुद्दा उपस्थित केल्याचा आरोप आ.निलंगेकर यांनी केला.ही चूक महायुती सरकारने दुरुस्त केली. त्यामुळे आता धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्र्न मार्गी लागणार आहे. या संदर्भात मी विधानसभेतही आवाज उठवला होता.भविष्यात महायुती सरकारच सत्तेत येणार असून या समाजाचा आरक्षणाचा विषय मार्गी लागेल,असेही ते म्हणाले. आ.निलंगेकर यांनी सांगितले की,निलंगा मतदारसंघात समाजाला योग्य तो सन्मान देण्याचे काम आपण केले आहे.या समाजाला राजकीय पाठबळ दिले. निलंग्याच्या नगराध्यक्षपदी बाळासाहेब शिंगाडे, पंचायत समितीचे सभापती म्हणून शिवाजीराव चेंडकापुरे, लातूरच्या उपमहापौरपदी देविदास काळे यांना संधी दिली.यापुढे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून समाजाला प्रतिनिधित्व देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. मतदारसंघातील गौडगाव येथे अहिल्यादेवींचा पुतळा उभारला. केळगाव व देवणी तालुक्यातील धनगरवाडी येथे लवकरच पुतळे उभारले जाणार आहेत. निलंगा शहरात अहिल्यासृष्टी उभारून समाजाचा सन्मान करण्याचे काम आपण केले आहे.आता मत विभागणीसाठी समाजाचा वापर केला जात आहे. विरोधकांच्या या डावापासून समाजाने सावध रहावे.राज्यात व निलंगा मतदारसंघातही महायुतीच्या पाठीशी रहावे,असे आवाहनही आ.निलंगेकर यांनी केले. विजयकुमार भोसले म्हणाले की,कॉंग्रेस व राष्ट्रवादीने जातीपातीचे राजकारण केले. त्यांनीच धनगर व धनगड असा तांत्रिक वाद उपस्थित करून आरक्षणाचा प्रश्र्न जटील करून टाकला.

## काय बोलता राव ?

बापरे बाप, सुधाकर शृंगारे यांचा कॉग्रस मध्ये प्रवेश झाला. खासदारकी भुषविलेल्या शृंगारे यांनी उदगीर, जळकोट मतदार संघा मध्ये उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न केला. परंतू भाजपाने नाकारले, कॉंग्रेसने ठोकरले, परंतू उद्याला काय करावे याचा विचार करुन माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी माजी मंत्री अमित देशमूख आणि ग्रामीणचे विद्यमान आमदार धिरज देशमूख यांच्या उपस्थिती मध्ये कॉंग्रेस मध्ये प्रवेश केला ही बाब, दलित चळवळीसाठी महत्वाची वाटते.

**काय बोलता राव,**

अरे, सुधाकर शृंगारे हे माजी खासदार असले तरी तळ्यातना मळ्यात अशी अवस्था झाल्यामूळे त्यांनी लोकसभा, विधानसभा नाही, तर नगरपालिका, महानगरपालिका महत्वाची असावी हेच धोरण स्विकारुण लातूर महानगरपालिकेच्या दृष्टीकोणातून त्यांनी कॉंग्रेस मध्ये प्रवेश केला असावा. खासदार, आमदार नाही तरी किमान लातूर महानगरपालिकेचा नगरसेवक किंवा संधी मिळाली तर महापौर, उपमहापौर किंवा एखाद्या विभागाचा सभापती म्हणून महाराष्ट्राच्या नव्हे परंतू लातूर जिल्ह्याच्या राजकारणात ही स्वतःचे अस्थित्व कायम ठेवावे म्हणून शृंगारे यांनी असा खटाटोप केला असेल तर तूम्हाला काय अडचण, बोला दाजीबा !

# कितने दिनो के बाद ...?

## संपादकीय...

कोण होतास तू, काय झालास तू, अरे वेड्या आज वाया गेलास कसा, आणि पुढे कसा काय आलास, हे कळतच नाही. त्यामूळे कितने दिनो के बाद..आया मिलन का, मतदान दिवस अशीच कुजबूज होताना दिसते आहे. महिला पुरुषानां समान मतदान करण्याचा हक्क असताना लाडक्या भावाची दिवाळी अंधारातच आणि बहिणीची दिवाळी मात्र फटाक्यात कशी काय होते, त्यामूळे बहिण, भावाच्या मतदानातून कोणाचे चांगभले होईल, हे सांगणे कठीण वाठते.

आजघडीला बाजारातील हलकल्लोळ पाहाताना महाराष्ट्राच्या राजकाणातील महागाई बेरोजगारीचा प्रश्न पकट होताना दिसतो आहे. नेहमी प्रमाणे महायुती आणि महाविकास आघाडीने आपापलया जाहिर नाम्यात सुसंस्कृत भाषा ऐवजी असंस्कृत भाषा वापरुन फुले, शाहू, आंबेडकराच्या महाराष्ट्राला दगाबाजी केल्याचे दिसते आहे.

तीन महिण्यापूर्वी शिंदे सरकारने युवाकार्य प्रशिक्षणेतून नागरी रक्कमेचा वापर केला. त्यात लाडकी बहीण योजना राबविली गेली, त्यातच लाडक्या भावाची दिवळी अंधारातच असताना कितने दिनो के बाद, मतदान दिनाच्या निमित्ताने ही रात्रदिनांची साय कशी उघडेल या संदर्भात सामाजीक वर्तूळात उलटसूलट कुजबूज होताना दिसते आहे.

वास्तविक पाहाता तिन तिगाडा, काम बिगाडा, अशीच अवस्था महायुती आणि महाविकास आघाडीत असल्याचे चित्र दिसते आहे. कारण असे की, कोणी कोणाच्या ताब्यात नसल्यामूळे लोकशाहीला जेरीस धरुण आपापला मनसुबा रेटण्यासाठी भाजपा बंडखोर शिवसेना राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस शरद पवारांची राष्ट्रवादी आणि ठाकरेची शिवसेना हे अस्तित्वासाठी झगडत असताना या सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडे मनोमिलन करणारी मतदाराची लोकभावना जागृत करण्याची गरज भासते आहे. त्यामूळे कितने दिनो की बात, हि चर्चा करण्याची गरज नसावी असे वाटते.

कारण असे की, दलित नाटककार प्रेणानंद गजवी यांनी तण माजोरी, नाटकातून भारतीय राजकारणासह महाराष्ट्राच्या सत्ताकारणातील दगाबाज राजकारणा बद्दल जे विश्लेशन केले होते, ते आजघडीला महाराष्ट्रातील राजकारणाच्या संदभात देवेंद्र फडणवीस की, शरद पवार ही रस्सीखेच केंद्रीय पातळीवरुन प्रकट होताना दिसते आहे. त्यामूळे कितने दिनो के बाद, मतदानदिनी कसे मिलन व्हावे ही समस्या मतदार सोडविणार की नाही, ही समस्या प्रसार माध्यमा समोर अवघड होताना दिसते आहे.

जेकरुण महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने भाजपा प्रणीत बंडखोर शिवसेना आणि राष्ट्रवादी बरोबर महाविकास आघाडीच्या कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि ठाकरेच्या शिवसेने बरोबर संघर्ष होत असताना एकमेकाच्या विरोधात कलगीतुरा होत असला तरी न्यायीक विकासा बाबत शिंदे सरकारकडे ज्या काही योजना आणि घोषणा आहेत त्याला प्रतियुत्तर देण्यासाठी महाविकास आघाडी ठोस पाऊले उचलत नाही. यातील गौडबंगाल काय असावे हे कळत नाही. कारण महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या संदर्भाने कालपरवा पर्यत वादीविरोधी नेते येवून गेले त्याना महाराष्ट्राच्या सत्ताकारणातील बेरजेचा रांगरंग कळाला नसल्यामूळे अवघ्या राजकीय हल्लकल्लोळात बाजारपेठे प्रमाणे राजकारणात ही नुसता कोलाहल्ल माजला असून अशा या अनागोदी कारभारात महाराष्ट्राची सत्ता कोणाकडे जाईल, कितने दिनो के बाद, हम आपके साथ है, या बाबतीत न्यायीक विचार कोण करणार किंवा मतदारानीच झाडाझडती करावी अशीच विसंगत कुजबूज होताना दिसते आहे, ती राजकीय दृष्ट्या महाराष्ट्राच्या वैभवाला दगाबाज ठरावी यात संदेह नसावा.

आजघडीला महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने शिंदे सरकार अग्रेसर असले तरी भाजपाचे देवेंद्र फडणवीस हे शिंदे गटाला टांग मारुण विरोधकाला जवळ करण्याच्या प्रयत्नात दिसत असल्याचे स्पष्ट होते आहे. कारण विधानसभा मतदार संघाच्या वाटाघाटीत अजित पवाराला डावलून शिंदे जवळ करणे, आणि शिंदे, पवार यांच्या मध्ये वाद निर्माण करण्याचा डाव फडणवीस करीत असून त्यास प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणि अमित शहा आणि महाविकास आघाडीतील नेत्यांचा आर्शिवाद असावा अशीच राजकीय वर्तूळात कुजबूज होताना दिसते आहे.

# दिवाळी सणाचे वैज्ञानिक महत्त्व

भारतीय संस्कृतीत सण–उत्सवांमागे सामाजिक, धार्मिक तसेच वैज्ञानिक कारणेही असतात. दिवाळी सणाचे वैज्ञानिक महत्त्व समजून घेताना आपण या सणाच्या वेगवेगळ्या अंगांकडे पाहू शकतो. दिवाळी हा सण आनंद, प्रकाश, आणि स्वच्छतेचा आहे. यामध्ये पर्यावरण, आरोग्य, मानसिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून वैज्ञानिक कारणे असू शकतात. दिवाळीचा सण मुख्यतः पाच दिवसांचा असतो, आणि त्यामागे काही वैज्ञानिक फायदेही असतात.

वातावरण शुद्धीकरण: दिवाळी ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात येते, जेव्हा पावसाळा नुकताच संपलेला असतो आणि हवेत आर्द्रता (आर्द्रता) वाढलेली असते. या काळात दिव्यांमुळे निर्माण होणारी उष्णता वातावरणातील उष्णता संतुलन राखते, जे हवेतील रोगजंतूंना कमी करण्यास मदत करू शकते. दिवाळीत धूप, अगरबत्ती, आणि उडदाच्या पीठाच्या लाह्या यांचा वापर केला जातो. धूपातील काही घटक जंतुनाशक म्हणून कार्य करतात, ज्यामुळे वातावरण शुद्ध राहते. तसेच दिव्यांच्या प्रकाशामुळे उबदार वातावरण तयार होते, ज्यामुळे वातावरणातील आर्द्रता कमी होण्यास मदत होते.

प्रकाश आणि सकारात्मकता: दिवाळीच्या वेळी विशेषतः पूर्वी दिवे, पणत्या तसेच कंदिलांची परंपरा होती. या दिव्यांच्या वापरामुळे वातावरणात उष्णता निर्माण होते, ज्यामुळे वातावरणातील हानिकारक जंतू आणि सूक्ष्मजंतू मरतात. दिव्यांच्या मंद प्रकाशामुळे वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. दिवाळी हा प्रकाशाचा सण म्हणून ओळखला जातो. दिवाळीत, विशेषत: लक्ष्मीपूजनादिवशी, तेलाच्या दिव्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. यातील उष्णता आणि धूर मच्छर व इतर हानिकारक कीटकांना दूर ठेवण्यास मदत करतो. यामुळे घरात स्वच्छता टिकवली जाते. घरासमोर दिवे लावून किंवा आकाशदिवे उंच ठिकाणी लावून अंधार दूर केला जातो. दिवाळीत दिव्यांचा वापर केला जातो, ज्यामुळे प्रकाशमान वातावरण तयार होते. हे प्रकाशमान वातावरण मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरते कारण यामुळे मनातील सकारात्मकता वाढते. तसेच, प्रकाशाच्या संपर्कामुळे आपला मूड सुधारतो, आनंदी राहण्यास मदत मिळते.

स्वच्छता आणि आरोग्य लाभ: दिवाळी साधारणतः पावसाळा संपल्यानंतर आणि हिवाळा सुरू होण्याच्या आधी साजरी केली जाते. ह्या काळात हवामानात आर्द्रता कमी होत असते आणि हवामान थंड होऊ लागते. अशावेळी घराची साफसफाई करणे, तेल आणि उटण्याचा वापर करणे, शरीराच्या त्वचेला पोषण देण्यासाठी आणि आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी फायदेशीर असते. दिवाळीपूर्व स्वच्छतेला भारतीय संस्कृतीत मोठे महत्त्व आहे. घरांची, अंगणांची आणि परिसराची सफाई केली जाते. यामुळे धूळ, कचरा, आणि रोगांचे स्रोत कमी होतात. यामुळे वातावरण स्वच्छ राहते आणि आरोग्य चांगले राखले जाते. दिवाळीच्या आधी घरोघरी स्वच्छता केली जाते. या स्वच्छतेमुळे घरातील धूळ, कीटक, आणि रोगजंतु नष्ट होण्यास मदत होते. पावसाळ्याच्या नंतर, वाढलेले कीटक आणि जंतु साफ करण्यासाठी दिवाळीतील स्वच्छतेचे काम फायदेशीर ठरते.



आहारातील बदल: दिवाळीमध्ये पारंपरिक गोडधोड पदार्थ बनवले जातात, ज्यामध्ये तीळ, साखर, शेंगदाणे, सुके मेवे यांसारख्या घटकांचा समावेश असतो. हे पदार्थ शरीराला आवश्यक ऊर्जा पुरवतात आणि हिवाळ्याच्या काळात उष्णता निर्माण करण्यास मदत करतात. दिवाळीच्या काळात पारंपरिक आहारात बदल होतो आणि त्यात काही विशेष पदार्थांचा समावेश असतो. या आहारातील बदलाचे काही फायदे आणि त्यामागची वैज्ञानिक कारणे पाहूया.

१. गोड पदार्थांचा समावेश: दिवाळीत बेसन लाडू, रवा लाडू, चकली, चिवडा, करंज्या, अनरसे यांसारखे गोड पदार्थ बनवले जातात. हे पदार्थ नैसर्गिक ऊर्जेचा स्रोत असून थंड वातावरणात शरीराला उर्जा देण्यास मदत करतात. साखर, गूळ, आणि तूप यांसारख्या घटकांमध्ये त्वरित उर्जा मिळवण्याची क्षमता असते, त्यामुळे दिवाळीत शारीरिक ऊर्जा टिकवण्यासाठी हे पदार्थ उपयुक्त ठरतात.

२.तुपाचा वापर:दिवाळीत लाडू, शंकरपाळे यांसारख्या पदार्थांत तूप वापरले जाते. तूप हे सुपाच्य असते आणि यामध्ये ओमेगा–३ फॅटी सिड्स असतात, जे मेंदूला पोषण देतात. तूप पचनसंस्थेला उत्तेजित करते आणि थंडीत शरीराला आवश्यक असलेले उष्मांक प्रदान करते.

३. मसाल्यांचे सेवन: दिवाळीच्या फराळात ओवा, जिरे, हिंग यांसारख्या मसाल्यांचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. हे घटक पचनक्रिया सुधारण्यात मदत करतात आणि वात, कफ, आणि पित्त दोष संतुलित ठेवतात. थंडीत अपचनाची समस्या टाळण्यासाठी या मसाल्यांचा समावेश फायदेशीर ठरतो.

४. सुकामेव्याचा वापर: दिवाळीच्या फराळात काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड यांसारखा सुकामेवा वापरला जातो. या सुकामेव्यांमध्ये उच्चप्रमाणात प्रोटीन, फॅट्स, आणि पोषक घटक असतात, जे शरीराला थंडीच्या काळात आवश्यक पोषण देतात. यामुळे त्वचा आणि केस यांना पोषण मिळते तसेच शरीराला उष्णता टिकवण्यासाठी मदत होते.

५. भरडधान्य आणि तांदळाचे पदार्थ: अनरसे, चकली यांसारख्या पदार्थात तांदळाचा वापर होतो. तांदूळ हे कर्बोदके प्रदान करणारे असून थंड वातावरणात शरीराला ऊर्जा मिळवण्यासाठी याची भूमिका महत्त्वाची असते. तसेच भरडधान्यांतील फायबर पचनसंस्थेचे आरोग्य राखते.

६. दही आणि ताक: पारंपरिक आहारात दही आणि ताकाचे सेवन फारसे होत नाही, कारण या पदार्थांमध्ये थंड गुणधर्म असतो. थंडीत पचन सुधारण्यासाठी गरम पदार्थांचे सेवन अधिक होते.

दिवाळीच्या काळात आहारात गोड, तुपकट, मसालेदार आणि सुकामेवा पदार्थांचा समावेश केला जातो, जो शरीराला थंडीच्या काळात आवश्यक उर्जा, पोषण, आणि उष्णता प्रदान करण्यास मदत करतो.

आयुर्वेदिक उपचार: दिवाळीचा काळ बहुधा हिवाळ्याच्या सुरुवातीला येतो. हिवाळ्यात रोगजंतूंची वाढ झपाट्याने होऊ शकते. दिवाळीच्या आधीची स्वच्छता, वातावरणातील जंतुनाशक प्रभाव, आणि दिव्यांमुळे होणारे उष्णतेचे प्रमाण या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे हिवाळ्यात होणाऱ्या संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध होतो. दिवाळीत अभ्यंगस्नानाची परंपरा आहे, ज्यामध्ये विशिष्ट औषधी तेलांचा वापर करून स्नान केले जाते. हे तेल शरीरातील त्वचेवर मृदुता आणून शरीरातील दोषांचे निवारण करण्यास मदत करतात. तसेच, शरीरातील रक्ताभिसरण सुधारते.

आर्थिक गती:विज्ञानाच्या दृष्टीने पाहता, दिवाळीच्या सणामध्ये आर्थिक व्यवहारात वाढ होते. लोक खरेदी, भेटवस्तू, सजावट, कपडे आणि इतर गोष्टींवर खर्च करतात, ज्यामुळे स्थानिक बाजारपेठेला चालना मिळते आणि आर्थिक चक्र गतीमान होते.

शरीर आणि मनावर सकारात्मक परिणाम – दिवाळी सणात विविध रंगी फटाक्यांचा आणि प्रकाशाचा वापर केला जातो, जो थोड्या प्रमाणात वातावरणातील दाब कमी करण्यास मदत करतो. यामुळे मनोविज्ञानावर सकारात्मक परिणाम होतो आणि आनंदी वातावरण निर्माण होते.

सामाजिक एकात्मता:– दिवाळी सणामुळे कुटुंबातील सर्व सदस्य, मित्र–परिवार एकत्र येतात. यामुळे आपसातील संबंध वृद्धिंगत होतात, जे मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्याला पोषक ठरते. दिवाळीला लोक एकत्र येऊन साजरा करतात, एकमेकांना भेटतात, शुभेच्छा देतात. यामुळे सामाजिक नाती दृढ होतात, सामजिक सलोखा वाढतो, आणि एकोप्याची भावना वाढते, ज्याचा सकारात्मक परिणाम मानसिक आरोग्यावर होतो.

नवीन वर्षाची सुरुवात:– अनेक भारतीय पंथांमध्ये दिवाळीपासून नवीन आर्थिक वर्ष सुरू होते, ज्याला शास्त्रीय दृष्टिकोनातून निसर्गाशी संबंधित केले जाते. हा काळ शेती, व्यापार, आणि आर्थिक नियोजनाचा काळ असल्याने निसर्गाशी आणि पर्यावरणाशी संतुलन राखण्यास मदत होते.

दिवाळी सण धार्मिक असून त्यामागे वैज्ञानिक कारणेही आहेत. स्वच्छता, प्रकाश, उष्णता, आणि सामाजिक सलोखा यांमुळे दिवाळी सण आरोग्यदायी आणि आनंददायी ठरतो. यातून दिसून येते की दिवाळीचा सण केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक नसून त्यामागे काही वैज्ञानिक आणि सामाजिक कारणेही आहेत, ज्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्य, वातावरण आणि जीवनशैलीवर होतो.

**इंजि. सौ. शितल अ. सवासे**

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल



भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थानंचा प्रश्न्न व निर्वासितांचा प्रश्न्न व निर्वासितांचे प्रश्न्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# कासारखेडा ग्रामपंचायत सदस्यांचा कॉँग्रेस पक्षात प्रवेश

लातूर प्रतिनिधी : लातूर ग्रामीण मतदारसंघामधील लातूर तालुक्यातील कासारखेडा येथील ग्रामपंचायत सदस्य श्री अजिंक्य शिंदे व श्री चेतन शिंदे यांनी कॉँग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणांवर व नेतृत्वावर विश्र्वास ठेवून आज बाभळगाव येथे लातूर ग्रामीणचे आमदार तथा महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे सरचिटणीस धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉँग्रेस पक्षात प्रवेश केला. आमदार धिरज देशमुख यांनी त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



लोकनेते विलासराव देशमुख, राज्याचे माजी मंत्री तथा सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा आमदार धिरज देशमुख यांच्यावर व कॉँग्रेसच्या विचारावर विश्र्वास दाखवत कासारखेडा ग्रामपंचायतीच्या दोन सदस्यांनी कॉँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी श्री संत शिरोमणी मारोती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, महेंद्र भादेकर, अनुप शेळके, बालाजी बिराजदार, रघुनाथ शिंदे, अजित काळदाते, गणेश शिंदे, विष्णू फावडे, शुभम गडदे, धिरज गिरी आदी उपस्थित होते.

# नागपूरचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे संविधान चौकातील घटनेची लेखी तक्रार दाखल.

नागपूर : दीक्षाभूमि दक्षता समितीच्या शिष्टमंडळाने आज नागपूरचे निवडणूक निर्णय अधिकारी यांची भेट घेऊन कार्यकर्त्यांनी नागपूर डॉ.बाबासाहेब तोडफोड करून जय आंबेडकरांनी धर्मनिरपेक्ष चे नारे लावून त्यांची म्हणून या प्रकरणाची अ‍ॅट्रॉसिटी कायद्या



राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या येथील संविधान चौकामध्ये असलेल्या आंबेडकरांच्या पुतळा परिसरामध्ये श्रीराम चे नारे लावले. डॉ.बाबासाहेब संविधान दिले. त्यांच्यासमोर जय श्रीराम विटंबना करणे म्हणजे अगण्य अपराध आहे. उच्चस्तरीय चौकशी करणे व संबंधितावर अंतर्गत गुन्हा दाखल करणे. इत्यादी विषयावर चर्चा झाली. या प्रसंगी दीक्षाभूमी दक्षता समितीचे अध्यक्ष माया उके, किशोर गेडाम, श्रीमती पौर्णिमा शेंडे, शोभाताई अंबादे, इतर पदाधिकारी उपस्थित होते......**सागर तायडे यांस कडून**

# ठाकरे गटाचे किसान सेनेचे माजी प्रदेशाध्यक्ष भास्कर लहाने यांचा भाजपात जाहीर प्रवेश

लातूर – शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जुने जेष्ठ शिवसैनिक महाराष्ट्र किसान सेनेचे माजी प्रदेशाध्यक्ष, हिंद किसान सेनेचे राष्ट्रीय माजी सचिव आणि रेणापूर तालुक्याचे माजी प्रमुख भास्कर लहाने यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री खा. डॉ. भागवतराव कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला.



शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचा कट्टर शिवसैनिक असून उद्धव ठाकरे यांनी खुर्चीसाठी भ्रष्ट काँग्रेसशी हात मिळवली. ज्या बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर काँग्रेसचा विरोध केला त्याच काँग्रेसचा विधानसभा निवडणुकीत प्रचार करण्याची वेळ येत असल्याने हे माझ्या अंतकरणाला पटत नव्हते त्याचबरोबर भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण मतदारसंघातील विकास कामांना प्रेरित होऊन भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश करीत असल्याचे भावना उद्धव ठाकरे गटाचे जुने निष्ठावंत जेष्ठ शिवसैनिक महाराष्ट्र किसान सेनेचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि रेणापूर तालुक्याचे माजी अध्यक्ष भास्कर लहाने यांनी व्यक्त केली.

भाजपाचे नेते महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून केंद्रीय माजी राज्यमंत्री खा. डॉ. भागवत कराड आणि भाजपाच्या इतर मान्यवर नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत भास्कर लहाने यांच्यासह रेणापूर तालुक्यातील मौजे माकेगाव येथील सोपानकाका लहाने, धोंडीराम लहाने, सुरेश केंद्रे, नाथराव लहाने, शंकर वागदये, ज्ञानेश्र्वर केंद्रे, श्रीहरी वागदये, सचिन वागदये, महादेव लहाने, रंगनाथ लहाने राजीव लहाने, शंकर लहाने यांच्यासह असंख्य जणांनी भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी रेणापूर तालुका भाजपा उपाध्यक्ष माकेगावचे सरपंच प्रा.एन. एन.लहाने, माजी चेअरमन बालाजी केंद्रे, रमाकांत लहाने, मंचक केंद्रे, भागवत लहाने, शंकर लहाने, संतोष लहाने, ज्ञानेश्र्वर केंद्रे, सचिन लहाने, वैजनाथ केंद्रे, अंकुश लहाने, परमेश्र्वर लहाने, धोंडीराम लहाने यांच्यासह इतर अनेकजण उपस्थित होते.

# थोडं खाजवा की...

**जय जिजाऊ , मित्रांनो .**

आमचा गेल्या चाळीस वर्षांचा अनुभव आहे की पुरोगामी चळवळीतील विचारवंत अभ्यासक व्याख्याते शाहिर प्रबोधनकार कार्यकर्ते पदाधिकारी व नेते पूर्ण ताकदीनिशी पुरोगामी आघाडी समजून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप पार्टीचे एकतर्फी समर्थन करतात . अक्षरशः घरच्या भाकरी खाऊन अनेक सहकारी म्हातारे होऊन पडले आहेत किंवा निघून गेले आहेत . परंतू सो कॉल्ड पुरोगामी राजकीय आघाडीने किंवा घटक पक्षांनी कधीही चळवळीतील नेते जवळ करुन राजकीय पदे दिली नाहीत . पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांना गृहित धरले जाते .. त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते . तुम्ही आमच्या शिवाय कुठे जाणार आहात ?? असे बोलून खजील करतात . एवढेच नाही तर बऱ्याचशा सो कॉल्ड पुरोगामी पक्षांचे प्रमुख पदाधिकारी आर एस एस चे कार्यकर्ते व समर्थक असतात .

अनुभव असा आहे की याउलट भाजप व आर एस एस वा शिवसेना कार्यकर्ते पदाधिकारी नेते आमदार खासदार मंत्री पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांचा आदर करतात . मदत करतात . लहान लहान मित्र पक्षांना विश्र्वासात घेऊन विधानपरिषद , विधानसभा , लोकसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये संधी देतात . या निमित्ताने काही तडजोडी केल्या जातात हे खरे आहे . परंतू त्यांच्या माध्यमातून बहुजन चळवळीतील काही कामे होतात . रामदास आठवले , महादेव जानकर , विनायक मेटे , सदाभाऊ खोत , पडळकर , सुषमा अंधारे , संजय राऊत ही उदाहरणे आहेत . तर सर्वसाधारणपणे काँग्रेस , राष्ट्रवादी काँग्रेस आर एस एस च्या जवळ असलेल्यांना संधी देतात .

आर एस एस व भाजप पूर्ण ब्राह्मणवादी आहेत हे खरे आहे . परंतू सो कॉल्ड पुरोगामी राजकीय आघाडी छुपी आर एस एस असल्याचे दिसून येते . आर एस एस चा जास्तीत जास्त अजेंडा राबविण्याची जबाबदारी संपूर्णपणे आतापर्यंत याच पुरोगामी राजकीय आघाडीने पार पाडलेली आहे . तर शक्य असूनही पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांना साहित्य संस्कृती मंडळ सारख्या बिगर राजकीय ठिकाणी देखील संधी देत नाहीत ...

मी स्वतः १९८६ पासून काँग्रेसच्या सर्वोच्च केंद्रीय कार्यकारिणी पासून स्थानिक पातळीवरील विविध नेत्यांकडे चळवळीतील परिचित कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी भेटत व फिरत होतो . नांवे लिहून घेतले जात . पण कधीच तिकिट दिले नाही . याउलट मी प्रथमच १९९५ मध्ये पुरोगामी आघाडीने नकार दिल्याने भाजपच्या नेत्यांना भेटलो . चिखली विधानसभा मतदारसंघातून बायको रेखाताई खेडेकर यांना तिकिट देण्याची विनंती केली . पुढे ती मान्य झाली . १९९५ , १९९९ व २००४ रेखाताई खेडेकर चिखली विधानसभा मतदारसंघातून निवडून आल्या होत्या. या काळात आम्ही मराठा सेवा संघाचे काम भरपूर वाढवले . अनुभव असा आहे की १९९५–९९ युतीचे सरकार असतानाच मराठा सेवा संघाचे काम सर्वाधिक वाढले . तरीही आम्ही शेवटपर्यंत आर एस एस विरोधी भूमिका घेतली . परिणामी २००९ मध्ये रेखाताई खेडेकर यांना भाजपने तिकिट नाकारले . ते अपेक्षित होते ...

सध्या महाराष्ट्रात अनेक शासकीय अधिकाऱ्यांच्या बायका भाजपच्या आमदार आहेत .

पुरोगामी राजकीय आघाडी व नेते पुरोगामी चळवळींना वा नेत्यांना नकारात्मक ताकद देतात . मदत करत नाहीत . मानपान नाही . पूर्ण गृहीत धरतात . चळवळीत फूट पाडण्यात रस घेतात . पुरोगामी चळवळीतील विचारवंत अभ्यासक व्याख्याते नेते तुलनेने आर्थिक दृष्ट्या सक्षम नसतात . मोठा खर्च करु शकत नाहीत . तर राजकीय नेते आर्थिक सहकार्य करत नाहीत . दुसरीकडे आर एस एस व भाजप पैशाचा पाऊस पाडतात ...

मित्रांनो , आदर्श , तत्वज्ञान , विवेक , समता स्वातंत्र्य बंधुता लोकशाही व सर्वोच्च संविधान उपाशी पोटी कसे सांभाळणार ??! शहीद होऊन काय मिळणार ? मलिदा कोण खाणार ??

पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी विचार हा वाद अखंडितपणे चालूच राहणार आहे . कालचे पुरोगामी नेते आज प्रतिगामी भाजपचे तर कालचे प्रतिगामी नेते आजचे पुरोगामी महाविकास आघाडीचे उमेदवार झाले आहेत . आम्ही काय करणार ??!! चळवळीतील नेत्यांना देखील राजकीय फायदा मिळेल अशी अपेक्षा असते . आर एस एस चे कार्यकर्ते जर पुरोगामी पक्षात घुसतात तर बहुजन चळवळीतील नेत्यांना एक स्ट्रॅटेजी म्हणून प्रतिगामी पक्षात घुमायला काय हरकत आहे ?? कोणत्याही परिस्थितीत भारतातील बहुजन विरुद्ध ब्राह्मण , हिंदू विरुद्ध मुस्लिम , पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी इत्यादी अनेक वाद बंद होणार नाहीत . तेच राजकारणात येणार . आम्ही सर्वच बहुजन चळवळीतील नेते राजकारणापासून दूर राहणे शहाणपण मानतो . हे अनैसर्गिक कृत्य आहे असे म्हणायला हरकत नाही . आर एस एस व भाजपचा जसा आपसात दुरान्वयानेही काही संबंध नाही . याच तत्त्वावर आधारित बहुजन चळवळीतील नेत्यांना आपल्या माध्यमातून राजकारण करणे आवश्यक आहे . आर एस एस चे कार्यकर्ते जर राष्ट्रपती , प्रधानमंत्री , मुख्यमंत्री , आमदार खासदार मंत्री , न्यायाधीश , जिल्हाधिकारी , सचिव , सेनाप्रमुख , होऊ शकतात . तर पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांना तेच करावे लागेल . सध्या आर एस एस चे कार्यकर्ते चंद्रावर तर पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते डोंगरावर. ही दुरवस्था झालेली आहे .

आर एस एस च्या माध्यमातून आम्हाला धर्माची दारु पाजून जातीची नशा चढवली जाते . आपल्याला देखील सुपर आर एस एस होण्यासाठी नियोजन व कृती करायची गरज आहे . आम्ही कोण होतो यापेक्षाही काय आहोत ?? भविष्यात काय व्हायचे आहे ?? हेच महत्त्वाचे आहे . तोच तोच कालबाह्य पुरोगामी विचार सांगण्यामुळे आमच्या कुटुंबातील सदस्य व मुलेमुली देखील दूर गेले आहेत . तेंव्हा एकच सल्ला आहे की , आमच्या शेतात व डोक्यात काय पिकते यावर बाजार चालत नाही तर बाजारात जे विकले जाते त्यावरच बाजार चालतो . त्यांचाच बाजारावर वरचष्मा असतो .

संघटना व संस्था जन्माला घालणे सोपे आहे. पण जसे मुलांचे पालनपोषण शिक्षण अवघड आहे . तसेच चळवळ चालवणे महाकठीण काम आहे . त्यासाठी आमच्याकडे पूर्णकालीन समर्पित व उच्च शिक्षित प्रशिक्षित मनुष्यबळ , सरप्लस अर्थबळ व दूरपर्यंत मजबूत नेटवर्क असणे गरजेचे आहे . आमच्याकडे खायची मरमर आहे . साचलेपण आले आहे . नवे चेहरे नाहीत . तसेच नवीन विचार नाहीत . आमचे मुलेमुली मोठमोठ्या पॅकेज वर देश परदेशात मजा करत आहेत . तर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आर एस एस ला पोषक काम करत आहेत . आम्ही देव देवता यात्रा देऊळ देवस्की कर्मकांड आणि भक्ती या बाहेर पडलो नाहीत . मनुस्मृती मधील तिरस्करणीय तरतुदी नष्ट झालेल्या आहेत . संविधान लागू आहे . पण आमची एनर्जी सतत मनुस्मृती मनुस्मृती घोकण्यावर खर्ची पडते . नवीन पिढीला शिक्षण , रोजगार , एकात्मता शांतता सुव्यवस्था सुरक्षितता बंधुभाव लिंगभाव पाहिजे . त्यासाठी आम्हाला एक व्हावे लागेल ..

शेवटी महत्वाचे म्हणजे आमच्या बहुतांशी चळवळी प्रांतिक क्षेत्रात व भाषेत विभागलेल्या आहेत . एक विचार असला तरी भाषा अनेक आहेत . आर एस एस केवळ राष्ट्रीय नाही तर जागतिक पातळीवर नावाजलेले संघटन बनले आहे . आर एस एस चे कार्यकर्ते बहुजन युवकांना कालबाह्य पौराणिक कथा सांगून त्यात गुंगवतात व आपली मुलेबाळे त्यापासून दूर ठेवतात . मुस्लिम विरोधी जिहाद आपल्याला सांगतात . तर आर एस एस च्या कुटुंबातील मुली मोठमोठ्या मुस्लिम कुटुंबातील मुलांसोबत लग्न करतात . यात कोणत्याही प्रकारचा ब्राह्मण द्वेष वा आर एस एस द्वेष नाही . तर सत्य स्पष्टपणे मांडणारे निवेदन आहे .

कृपया सर्वांनीच गंभीरपणे विचार करून योग्य निर्णय घ्यावा ही विनंती आहे .

सर्वांनाच दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा .

**पुरुषोत्तम खेडेकर चिखली .**
**दिनांक -२९-१०-२०२४ .**

# बाबासाहेबांनी दिलेली लोकशाही बळकट करण्यासाठी महाविकास आघाडीला सत्तेत पाठवा – माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर

भोकर /सिद्धार्थ जाधव /डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेच्या माध्यमातून मतदानाच्या अधिकाराद्वारे विधानसभा निवडणुकीमार्फत येणाऱ्या पाच वर्षासाठी राज्याची सत्ता कोणाच्या हाती द्यायची ही येथील सुजाण मतदारांच्या हातात आहे.



याच सुजाण मतदारांनी देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी धर्मनिरपेक्ष असलेल्या महाविकास आघाडीकडे सत्ता द्यावी. येथील धनदांडग्याकडून आपलीच घरे भरून घेण्यासाठी आपल्याच घरात मंत्री,खासदार, आमदार झाले पाहिजे असा अट्टाहास असून भविष्यात निर्माण होणारे राज्य हे जनतेचे राज्य असले पाहिजे.यासाठी धन्य दांडगे यांच्या अमिषाला बळी न पडता सर्वसामान्य निष्ठावंत कार्यकर्त्याला निवडून दिले पाहिजे.

या मोदी सरकारने देशात हिंदू–मुस्लिम , धर्माधर्मात मंदिर मज्जित च्या नावाखाली दंगली घडवल्या,भाजपकडून काँग्रेसवर इडी सीडी सीबीआयच्या माध्यमातून हल्ला होत असताना आपले घोटाळे लपवण्यासाठी अशोकराव चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. अशावेळी खिडकीळ झालेल्या काँग्रेसला या नांदेड जिल्ह्यामध्ये काल दिवंगत वसंतराव चव्हाण यांनी उभा पुन्हा उभा केली. येथील सुजाण मतदार पक्षाशी व मतदारांशी केलेली गद्दारी ओळखून वसंतराव चव्हाण यांना मोठ्या मताधिक्यांनी विजयी केले. आज त्यांच्याच उच्चशिक्षित प्राध्यापक असलेला रवींद्र चव्हाण यांना काँग्रेस महाविकास आघाडीने नांदेड लोकसभेसाठी उमेदवारी दिली व पक्षाशी निष्ठा बाळगणाऱ्या तिरुपती उर्फ पप्पू कोंढेकर यांना भोकर विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी दिली असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशासाठी दिलेली लोकशाही बळकट करायचे असेल या दोन्ही उमेदवारांना भरघोस मताने विजय करून महाविकास आघाडीला सत्तेत पाठवा असे आवाहन माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर म्हणाले.

८५–भोकर विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेस महाविकास आघाडी कडून देण्यात आलेले अधिकृत उमेदवार तिरुपती उर्फ पप्पू पाटील कोंढेकर यांच्या नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अनुषंगाने भोकर शहरात दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित महारॅली व जाहीर सभेस संबोधित करताना अध्यक्षस्थानी माजी मंत्री डॉ.माधवराव पाटील किन्हाळकर बोलत बोलत होते.

यावेळी नांदेड लोकसभा पोटनिवडणूक मतदार संघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार रवींद्र चव्हाण, भोकर विधानसभा मतदार संघाचे काँग्रेस महाविकास आघाडी चे अधिकृत उमेदवार पप्पू पाटील कोंढेकर, नांदेड उत्तरचे उमेदवार अब्दुल सत्तार अब्दुल गफार, शिवसेना ठाकरे गटाचे बबन बारसे , जिल्हा सरचिटणीस काँग्रेस कमिटी सतीश पाटील कदम मातुळकर,काँग्रेसचे भोकर तालुका अध्यक्ष गोविंद पाटील गौड, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष ड. शिवाजी कदम, काँग्रेसचे शहराध्यक्ष तौसीफ इनामदार, दादाराव पाटील ढगे, बाळासाहेब पाटील रावणगावकर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे पाटील, सुभाष पाटील किन्हाळकर, सुभाष पाटील कोळगावकर, दत्तात्रय पांचाळ, अप्पाराव राठोड, सुरेश बिल्लेवाड, शिवाजी पाटील लगळूदकर, उमेश कापसे, रजाक भाई प्रेस वाले आदींसह महाविकास आघाडीतील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती

यावेळी काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार तिरुपती उर्फ पप्पू पाटील कोंढेकर बोलताना म्हणाले की, मागील ७० वर्षांमध्ये शंकरराव चव्हाण, अशोकराव चव्हाण यासह चव्हाण कुटुंबीयांचे काँग्रेसने अस्तित्व निर्माण केले. त्यांनी त्याच काँग्रेसची दगाबाजी केली. ज्या मतदारसंघातील मतदारांनी कार्यकर्त्यांनी त्यांना मोठे केलं त्याच कार्यकर्त्यांना मतदारांना अशोक चव्हाण यांनी लुंगी सुंगी वाले म्हणून हिणवले. सर्व जाती धर्मातील लोकांना घेऊन चालणारा एकमेव असलेला काँग्रेस पक्ष त्या पक्षातील कार्यकर्त्यांना संपवण्याचं काम अशोक चव्हाण यांनी केले. पक्षाशी , मतदार संघातील मतदारांशी केलेली दगाबाजी येथील मतदार विसरले नसून त्यांनी केलेल्या दगाबादीचा बदला या निवडणुकीच्या अनुषंगाने पप्पू कोंढेकर नक्कीच घेईल. अशोक चव्हाण यांना जेव्हा डोळ्यासमोर पराभव दिसतो तेव्हा विरोधकांना ते नाव बोट ठेवतात तसेच माझ्याबद्दल ते बोलत आहेत. माझ्या निष्ठेवर विश्र्वास ठेवून पक्षाने मला उमेदवारी दिल्याबद्दल त्यांचे लाख लाख आभार मानून मतदार संघातील विकासाला चालना द्यायची असेल आणि मतदारांसोबत केलेल्या दगाबाजीचा बदला घ्यायचा असेल तर मला, माझ्या निष्ठेला, काँग्रेस पक्षाला, महाविकास आघाडीला साथ द्या असे आवाहन यावेळी केले.

युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे पाटील बोलताना म्हणाले की, जाती जातीत विविध मुद्द्यावरून भांडण लावण्याचे काम या भारतीय जनता पार्टीने केले. काँग्रेसच्या त्रासामुळे मी काँग्रेस पक्ष सोडून भाजप प्रवेश केला असे म्हणणारे अशोक चव्हाण व चव्हाण कुटुंब मागील सत्तर वर्षात काँग्रेस पक्षाकडून अनेक मंत्रीपद भोगली यावेळी यांना काँग्रेस पक्षाचा त्रास कळाला नाही का...? छत्रपती शिवाजी महाराजांचा बोगस पुतळा उभारण्याचे पाप या बैमान सरकारने केले.या बेइमान सरकारला आपली जागा दाखवण्यासाठी भोकर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस महाविकास आघाडीने दिलेल्या उमेदवारास आपण भरघोस मतांनी विजयी करा असे आवाहन केले.

भोकर तालुका अध्यक्ष गोविंद पाटील गौड बोलताना म्हणाले की, भोकर विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी चव्हाण कुटुंबीयांकडे मागील पंधरा वर्षापासून सत्ता दिली परंतु या मतदारसंघातील पाण्याचा प्रश्न्न शिक्षणाचा प्रश्न्न आरोग्याच्या प्रश्न्न यांनी आजपर्यंत मार्गी लावला नाही. त्यांनी फक्त नारळ फोडण्याचे काम केले.

या संकल्प रॅली व जाहीर सभेस भोकर विधानसभा मतदारसंघातील मुदखेड अर्धापूर भोकर या तिन्ही तालुक्यातून मोठ्या संख्येने काँग्रेस महाविकास आघाडीतील कार्यकर्ते पदाधिकारी जनसमुदाय जमला होता.

**सत्य गणपती समोर दिल्या घेतल्या वचनाशी कटिबद्ध राहून इच्छुक उमेदवार आले एकत्र**

८५–भोकर विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेस महाविकास आघाडी कडून एकूण पक्षातील १३ निष्ठावंत कार्यकर्त्यांनी पक्षाकडे इच्छुक म्हणून उमेदवारांनी उमेदवारी मागितली होती.

या १३ निष्ठावंत कार्यकर्त्यांनी नांदेड लोकसभेचे खासदार काल दिवंगत वसंतराव चव्हाण यांच्या समक्ष भोकर फाटा येथील सत्य गणपती समोर एकमेकांना वचन देवून पक्षाने उमेदवारी कोणालाही दिल्यास आपण सर्वांनी मिळून त्या उमेदवारा सोबत खंबीरपणे उभे राहून काम करायचे असे ठरले. यावेळी दादाराव पाटील ढगे,गोविंद बाबा गौड पाटील, बाळासाहेब पाटील रावणगावकर, बी आर कदम, सुभाष पाटील किन्हाळकर,बालाजी गाडे पाटील, संदीप देशमुख बारडकर आदींसह इतर इच्छुक उपस्थित होते. या दिल्या घेतल्या वचनाशी सर्व इच्छुक आज कटिबद्ध राहून भोकर विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेस महाविकास आघाडीने दिलेले उमेदवार पप्पू पाटील कोंढेकर यांच्यासोबत खंबीरपणे उभे आहेत.

# भारतीय बौद्ध महासभा भोकर तालुका महिला कार्यकारिणी गठीत तालुकाध्यक्ष पदी प्रयागबाई गौतम हनुमंते यांची निवड

भोकर– भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा कार्यकारणी वरील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत भोकर येथे नुकतीच बैठक पार पडली आहे. या बैठकीत भारतीय बौद्ध महासभा भोकर तालुका महिला कार्यकारिणी गठीत करण्यात आली असून भोकर तालुकाध्यक्ष पदी प्रयागबाई गौतम हनुमंते यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

भारतीय बौद्ध महासभेचे संस्थापक अध्यक्ष बोधिसत्व डॉ .बाबासाहेब आंबेडकर,राष्ट्रीय संरक्षक महाउपासिका मीराताई यशवंतराव आंबेडकर, ट्रस्टी चेअरमन डॉ. हरीष रावलिया,राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या धम्म कार्याचा प्रचार,प्रसार करण्याच्या अनुषंगाने रविवार दि.२७ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ठिक ११ वाजता तक्षशीला बुद्ध विहार पंचशील नगर भोकर येथे भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हाध्यक्षा नांदेड उत्तर आद.आणिताताई खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा संस्कार सचिव प्रा .आप्पाराव येरेकार यांची उपस्थिती मध्ये सर्वप्रथम आदर्शांची पुजा करून त्रिसरण पंचशीला घेण्यात आले व महिलांची नूतन कार्यकारिणी गठीत करण्यात आली यामधे भोकर तालुका अध्यक्षपदी प्रयागबाई गौतम हनुमंते तर सरचिटणीस धम्मशीला सावळे ,शांताबाई चोखोबा गायकवाड,



संजय सोनकांबळे,कोषाध्यक्षा ललीताबाई बामणाजी कदम,उपाध्यक्ष यशोधरा आप्पाराव येरेकार,

संरक्षण उपाध्यक्ष वैशाली विजय जाधव,पर्यटण उपाध्यक्षा आम्रपाली नागभूषण गायकवाड, कार्यालयीन सचिव गोदावरीबाई संतोष तोडे, हिशोब तपासणीस सत्यभामा गंगाधर गायकवाड, संस्कार सचिव सुकेशना संजय गुंडेराव, पुष्पाताई चंद्रकांत धमसे ,पर्यटन सचिव लक्ष्मीबाई गोरखनाथ म्हस्के ,प्रेमला विलास सावळे,संरक्षण सचिव नागराबाई सुरेश संघटक रमाबाई शाहीर गडपाळे, करूणाताई नंदू गडपाळे,अनुसयाबाई गंगाधर कांबळे, लक्ष्मीबाई साईनाथ डोंगरे,भारतबाई परशुराम गायकवाड, गंगासागर दिनेश हनुमंते, आम्रपाली राजु दांडगे आदी महिलांची विविध पदावर निवड करण्यात आली.

यावेळी शहरासह तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. नूतन कार्यकारणीतील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून सरणेतेय गाथा घेऊन या बैठकीची सांगता करण्यात आली.

# फटाके मुक्त दिवाळी साजरी करा ! समाजसेवक गजानन हरणे यांचे आवहान.

दिवाळी जवळ आली असल्यामुळे सर्वत्र फटाक्याची दुकाने लागली आहेत.तसेच फटाके घेण्यासाठी मुलांची धावपळ चालू आहे.या दिवाळीत फटाके फोडून प्रदूषण केल्यापेक्षा अनेक लोकांना त्रासदायक कृत्य केल्यापेक्षा ही दिवाळी आपण सर्वांन मिळून 'फटाके मुक्त दिवाळी' साजरी करण्याचे आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी केले आहे.

खऱ्या अर्थाने या दिवाळीचा आनंद आपण व इतरांना घेऊ देऊ,दिवाळी आली म्हणजे फटाके आले हा जो समज निर्माण झाला आहे तो सर्वांमिळून तोडूया.दिवाळीनिमित्त शहरात व गावागावांत फटाके उडवले जातात.फटाक्यांमुळे लहान मुले भाजू शकतात. कित्येक ठिकाणी आगी लागतात.मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक,आजार माणसे व लहान मुले यांनाही मोठा प्रमाणात त्रास होत असतो.खिशाला सुद्धा आर्थिक फटका बसत असतो.आज अनेक शहरातील प्रदूषणाची पातळी वाढलेली आहे.दिवाळीचा आनंद कुटुंबीयांसोबत साजरा करावा.फराळ पाण्याचा आनंद घेऊ या.परंतु,दिवाळी मात्र फटाके मुक्त साजरी करूया.यासाठी आई– वडिलांनी मुलांना तसेच शाळा, कॉलेज,महाविद्यालयात सुद्धा फटाके फोडू नये म्हणून प्रबोधन करणे काळाची गरज आहे.पर्यावरणाचा हा प्रश्न्न गंभीर होत आहे. त्यामुळे समाजातील सर्व जागरूक नागरिकांनी या गंभीर बाबीकडे होणारा पर्यावरणाचा रास थांबवण्यासाठी 'फटाके मुक्त परिवार' व फटाक्यांवर स्वयंघोषित नियंत्रण आणण्याची गरज आहे. त्यासाठी फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन गजानन हरणे,समाजसेवक तथा संयोजक निर्भय बनो जनआंदोलन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे राज्यातील नागरिकांना,तरुण युवक,युवतींना केले आहे.

**गजानन ओंकार हरणे,संवाद- ९८२२९४२६२३.अकोला.**
**समाजसेवक,संयोजक -निर्भय बनो जन आंदोलन.**

**नव दिपोत्सव ..**

दिवाळी करी साजरी
वृद्धाश्रमात कधीतरी
वाटे त्यांना सुखानंदे
आहोत आपल्या घरी

सजवावे आश्रम घरा
दीप उजळा परिसरी
वृध्द हात ते तालधरी
पहाट गाणी एकसुरी

उटणे सुगंधी साबण
तैल मर्दन सेवा करी
मळ सारा अहंकारी
गळूनि पडे खरोखरी

सुरु होणार हिवाळा
द्यावी वस्त्रे नवी बरी
पांघरती स्नेहाळ प्रेम
नाही त्याची बरोबरी

सोसेल अशी फराळी
पंगतीला हवीत सारी
भुके पेक्षा शांती उरी
तृप्तता देईल ढेकरी

दिपावली ही भरजरी
अनुभवा एकदा तरी
चिरकाल होई तृप्ती
प्रकाश उजळे अंतरी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

# फक्त सिगारेट किंवा गुटख्यानेच नव्हे, तर या ३ कारणांमुळेही होऊ शकतो तोंडाचा कॅन्सर

एप्रिल महिना हा मुख कर्करोग जनजागृती महिना म्हणून साजरा केला जातो. या मोहिमेद्वारे लोकांना सांगितले जाते की त्यांनी तोंडाच्या कर्करोगाबाबत जागरुकता बाळगावी, जेणेकरून काही गोष्टींची काळजी घेऊन, ते या गंभीर आजारापासून दूर राहतील. बहुतेक प्रकरणांमध्ये, तोंडाचा कर्करोग पुरुषांमध्ये होतो. भारतातील बहुतांश पुरुषांना सिगारेट किंवा गुटख्याचे व्यसन आहे आणि त्यामुळेच देशातील पुरुषांमध्ये हा कर्करोग सर्वात जास्त आहे. अहवालानुसार, देशात दरवर्षी सुमारे १ लाख तोंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांची नोंद होते.

लोकांमध्ये असा समज आहे की तोंडाचा कॅन्सर हा केवळ नशा केल्याने होतो, मात्र तसे नाही. हे लठ्ठपणा किंवा संसर्गामुळे देखील होऊ शकते. जाणून घ्या तोंडाच्या कर्करोगाची काही कारणेष्ठ

कॅन्सर कधी आणि का होतो हा मोठा प्रश्न आहे. जेव्हा आपल्या शरीरात जास्त पेशी



तयार होतात तेव्हा त्या अनियंत्रित होतात. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, ज्यांचे वजन जास्त असते, त्यांचे प्रयत्न वेगाने वाढतात. त्यामुळे सर्व प्रकारच्या कर्करोगाचा धोका वाढतो. विविध प्रकारचे संप्रेरक तयार होण्यापासून रोखण्यासाठी निरोगी दिनचर्या पाळणे सुरू करा.

वजन कमी केल्यामुळे किंवा बाहेरचे अन्न खाल्ल्याने शरीरात पोषक तत्वांची कम तरता भासते. या प्रकारच्या चुकीमुळे गंभीर आजारांना जन्म मिळतो, त्यापैकी एक म्हणजे तोंडाचा कर्करोग. निरोगी राहणे चांगले आहे, परंतु त्याच्या नावाखाली पोषक घटकांपासून अंतर ठेवणे देखील चुकीचे आहे. सकस आहार आणि चांगल्या दिनचर्येने ही कमतरता दूर करता येते.

बदलत्या जगात लोक अत्याधुनिक पद्धतीने स्वत:ची काळजी घेतात. विशेषत: शहरांमध्ये अशा पद्धती अवलंबल्या जात आहेत, ज्यांचे फायदे कमी आणि तोटे जास्त आहेत. यापैकी एक म्हणजे माउथवॉश. त्यात केमिकल आणि अल्कोहोल असते ज्यामुळे तोंडाच्या कर्करोगाचा धोका वाढतो. स्प्रे माउथवॉश सर्वात जास्त नुकसान करतात.

# काँग्रेसच्या आमदाराची पंधरा वर्षे पाहिली ;पाच वर्षे मला संधी देऊन बघा– आ. कराड

लातूर – लातूर ग्रामीण मतदार संघातून गेल्या पंधरा वर्षात निवडून गेलेल्या काँग्रेस आमदारांनी भादा सर्कलमध्ये काय काम केले ? कुठल्या विकास योजना आणल्या ? असा प्रश्न उपस्थित करून विविध विकास कामासाठी गेल्या तीन वर्षात कोठ्यावधी रुपयाचा निधी आणण्यात मला यश आले असून काँग्रेस आमदाराची पंधरा वर्षे पाहिली मला फक्त पाच वर्ष संधी देऊन पहा संधीच सोन करून दाखवीन अशी ग्वाही भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांनी दिली.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांनी बुधवारी बोरगाव (न) येथील श्रीनकुलेश्र्वर देवस्थानात जाऊन दर्शन घेवून भादा सर्कल मधील प्रचार दौऱ्याला प्रारंभ केला या दौऱ्यात बोरगाव (न), कवठा, भेटा, आंदोरा, जायफळ, शिवली, बिरवली, वरवडा, रिंगणी यासह अनेक गावचा प्रचार दौरा केला ठीक ठिकाणी मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन समर्थन दर्शविले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, फकीरा ब्रिगेडचे प्रा. संजय शिंदे, विजय काळे, साहेबराव मुळे, पद्माकर चिंचोलकर, बालाजी शिंदे, उमेश बेद्रे, रविंद्र पाटील, श्रीपाद शिंदे, बालाजी साळुंखे, धनराज शिंदे, सतीश कात्रे, महादेव गुरुशेट्टी, समाधान अडगळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

ठीक ठिकाणच्या प्रचार बैठकीत बोलताना महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब पंतप्रधान झाल्यापासून आणि राज्यात महायुतीचे शासन सत्तेवर आल्यापासून गोरगरीब अठरापगड जाती धर्मांना न्याय देण्यासाठी मोफत अन्नधान्य, शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण, शेतीला मोफत वीज पुरवठा यासह विविध योजना सुरू केल्या विकासापासून कोसोदूर असणाऱ्या घटकांना विकासाच्या प्रवाहात आणले. आज प्रत्येक कुटुंबाला कुठल्या ना कुठल्या योजनेचा लाभ मिळाला आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील साडेतीनशेहून अधिक मंदिराचा जिर्णो द्धार करण्याचे भाग्य मला लाभले असून मतदारसंघातील गावागावात वाढीव उपस्थित शासनाच्या विविध योजनेचा निधी मंजूर करून अनेक विकास योजना कार्यान्वित केल्या मात्र निवडून गेल्यानंतर काँग्रेसचा आमदार पुन्हा कधी गावात आला का त्यांनी काय विकासाची कामे केली असा प्रश्न उपस्थित करून माझ्या माध्यमातून आणि भाजपा शासनाच्या माध्यमातून मंजूर झालेल्या योजनाचे श्रेय घेण्याचा केविलवाणी प्रयत्न करीत आहेत. हे आमदार महाशय लातूरचे आहेत की, मुंबईचे फिरायला गेल्याप्रमाणे बॅग भरून मतदार संघात येतात असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, गेल्यावेळी मतदार संघाला विकत घेण्याचे पाप केले. उसाचे राजकारण करून शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न केला जात आहे देशमुखांचा एकदा टांगा पलटी करावाच लागेल त्याशिवाय शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल होणार नाही आणि मतदार संघाच्या विकासाला गती प्राप्त होणार नाही तेव्हा येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी कमळ चिन्हा समोरील बटन दाबून काम करण्याची मला संधी द्यावी असे बोलून दाखवले.

प्रत्येक ठिकाणच्या प्रचार बैठकीत त्या त्या गावातील भाजपा कार्यकर्त्यांनी महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांना मताधिक्य मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त केला. तर मतदारांनी यावेळी कुठल्याही परिस्थितीत आप्पांनाच आमचे मत असल्याचे बोलून दाखवले.

## फटाके मुक्त दिवाळी साजरी करा ! समाजसेवक गजानन हरणे यांचे आवहान.

दिवाळी जवळ आली असल्यामुळे सर्वत्र फटाक्याची दुकाने




लागली आहेत.तसेच फटाके घेण्यासाठी मुलांची धावपळ चालू आहे.या दिवाळीत फटाके फोडून प्रदूषण केल्यापेक्षा अनेक लोकांना त्रासदायक कृत्य केल्यापेक्षा ही दिवाळी आपण सर्वांन मिळून 'फटाके मुक्त दिवाळी' साजरी करण्याचे आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी केले आहे.

खऱ्या अर्थाने या दिवाळीचा आनंद आपण व इतरांना घेऊ देऊ,दिवाळी आली म्हणजे फटाके आले हा जो समज निर्माण झाला आहे तो सर्वांमिळून तोडूया.दिवाळीनिमित्त शहरात व गावागावांत फटाके उडवले जातात.फटाक्यांमुळे लहान मुले भाजू शकतात. कित्येक ठिकाणी आगी लागतात.मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक,आजार माणसे व लहान मुले यांनाही मोठा प्रमाणात त्रास होत असतो.खिशाला सुद्ध आर्थिक फटका बसत असतो.आज अनेक शहरातील प्रदूषणाची पातळी वाढलेली आहे.दिवाळीचा आनंद कुटुंबीयांसोबत साजरा करावा.फराळ पाण्याचा आनंद घेऊ या.परंतु,दिवाळी मात्र फटाके मुक्त साजरी करूया.यासाठी आई- वडिलांनी मुलांना तसेच शाळा, कॉलेज,महाविद्यालयात सुद्धा फटाके फोडू नये म्हणून प्रबोधन करणे काळाची गरज आहे.पर्यावरणाचा हा प्रश्न गंभीर होत आहे.त्यामुळे समाजातील सर्व जागरूक नागरिकांनी या गंभीर बाबीकडे होणारा पर्यावरणाचा रास थांबवण्यासाठी 'फटाके मुक्त परिवार' व फटाक्यांवर स्वयंघोषित नियंत्रण आणण्याची गरज आहे. त्यासाठी फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन गजानन हरणे,समाजसेवक तथा संयोजक निर्भय बनो जनआंदोलन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे राज्यातील नागरिकांना,तरुण युवक,युवतींना केले आहे.

**गजानन ओंकार हरणे**
**९८२२९४२६२३.**
**अकोला.**

# आचारसंहितेचे पालन करताना जाणून घ्या 'काय करावे' आणि 'काय करू नये'

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका २०२४ जाहीर होऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य आणि नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पडाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नियम ठरवून दिले आहेत. या नियमांनाच 'आचारसंहिता' म्हटले जाते. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

आचारसंहिता अधिक विस्तृत असल्याने त्यापैकी निवडणूक काळात राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी 'काय करावे' आणि 'काय करू नये' याबाबत काही महत्त्वाची तत्वे सांगितलेली आहेत.

आचारसंहिता काळात काय करावे?

निवडणूक घोषित होण्यापूर्वी सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील. पूर, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी मदतीचे कार्य सुरू ठेवता येईल. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रकमेची किंवा इतर वैद्यकीय मदत देता येईल. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका ही त्यांची धोरणे, पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी. स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी.

प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक किंवा इतर सुविधांचा वापर करण्याची परवानगी मिळवावी आणि ते वापरण्याच्या नियमांचे पालन करावे. सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. मिरवणूक सुरू होण्याची तसेच संपण्याची वेळ व जागा आणि ती जिथून जाणार असेल तो मार्ग अगोदर निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मतदारांना पुरविण्यात येणाऱ्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.

आचारसंहिता काळात काय करू नये?

निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंर्त्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारुचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने–आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे.

इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी–व्हिजील ॲपवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## राशीभविष्य ३१ ऑक्टोबर २०२४

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
उद्योग व्यवसायात मनासारखे यश मिळण्याचे योग आहेत. विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परिक्षेत भाग घ्यावा यश मिळेल. मुलांची प्रगती होईल.जोखमीचे कामे शक्यतो टाळा.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पश्चिम
व्यवसायीक जोखीम उठवू नका. कर्जापासून मुक्ती मिळेल. मुलांच्या यशामुळे आनंदी रहाल. आर्थिक समस्या दुर होईल.

मिथुन: शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम
कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. आर्थिक क्षेत्रात मनासारखे परिणाम दिसून येतील. मुलांकडून सुखद बातम्या ऐकण्यास मिळतील. आपल्या व्यसनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पश्चिम
कामकाजात परिवर्तन होण्याऱ्या योजना टाळाव्यात. आर्थिक प्रकरणी सावधानी बाळगात. संततीच्या समस्या राहतील. नातेवाईकांशी वाद होण्याची शक्यता आहे.

सिंह : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व
कोणावरही विश्वास ठेवणे आपल्या दृष्टीने धोकेदायक आहे. किरकोळ घरगुती समस्या राहील. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. आरोग्याची काळजी राहणार नाही.

कन्या : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पूर्व
आत्मविश्वास वाढणार आहे. नवीन कामकाजामुळे इच्छित लाभ होईल. आरोग्याची काळजी घ्या. राहण्याची समस्या दूर होण्याची शक्यता आहे.

तुळ : शुभ रंग :पिवळा, शुभ दिशा : पूर्व
आपल्या क्षमतेचा व योग्यतेचा पुरेपूर उपयोग करण्याच्या संधी मिळतील. घाईगडबडीने घेतलेले निर्णय नुकसान पोहचवतील. कौटुंबिक स्थिती चांगली राहील. व्यापार फायदेशीर.

वृश्चिक :शुभ रंग: निळा, शुभ दिशा:दक्षिण
नवीन आखलेल्या योजना यशस्वी होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. कामकाजात प्रगती होण्याचे योग आहेत. व्यापारात घेतलेला नवीन निर्णय फायदेशीर राहील. भावनावश होऊन कोणताही निर्णय घेऊ नका.

धनु: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण
आपल्या कामाची स्तुती होईल. कौटुंबिक संबंध सुधारतील. नवीन व्यापारातील प्रस्ताव येतील. उत्तम वस्र, जेवण मिळेल. कायद्याच्या कामी वेळेचे ध्यान ठेवा.

मकर: शुभ रंग :हिरवा,शुभ दिशा:पूर्व
पूर्वी केलेल्या कामाचे चांगले परिणाम दिसण्यास सुरूवात होणार आहे. पत्नीची मदत मिळेल. भागीदारीचे व्यवहार फायदेशीर राहीतल. आपल्या वस्तुं संभाळून ठेवा.

कुंभ : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा : पूर्व
सामाजिक कामात सक्रीय व्हाल. विरोधक आपल्याशी समझौता करण्याचा प्रय्त्न करतील. व्यापारीक गोपनियता ठेवा. धार्मिक कामामध्ये मन रमेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

मीन : शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: पश्चिम
धार्मिक कामात अधिक वेळ जाणार आहे. समाजात मान सन्मान वाढेल. व्यापार चांगला चालेल. मित्रांच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होईल. द्वेष करू नका.

## इतिहासात आजचा दिवस ३१ ऑक्टोबर

अंतरराष्ट्रीय

१९४५ – डच सैनिक आणि इंडोनेशियाचे स्वतंत्र्यसैनिक यांच्यात मध्यस्थी करणाऱ्या ब्रिटिश ब्रिगेडियरची हत्या. सिंगापूरमध्ये आणीबाणीसह ब्रिटिश सैन्यास दक्षतेचे आदेश.
१९५६ – सुवेझ कालव्याच्या राष्ट्रीयीकरणाच्या इजिप्तच्या निर्णयानंतर ब्रिटिश विमानांनी कैरोवर प्रथमच बॉम्बफेक केली.
१९६६ – भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी पनामा कालवा पोहून पार केला.
१९७१ – स्वित्झर्लंडमध्ये सार्वजनिक निवडणुकीमध्ये प्रथमच महिलांना मत देण्याचा अधिकार प्राप्त झाला.
२००२ – तमीळ वागांचा नेता वेलुपलाई प्रभाकरनला कोलंबोतील उच्च न्यायालयाने २०० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा फर्माली.

राष्ट्रीय

इ.स.पू. १९३१ – श्रीकृष्णाने 'हा सूर्य व हा जयद्रथ' असे शब्द उच्चारताच अर्जुनाने जयद्रथाचा वध केला.
१८८० – मराठी रंगभूमीवरील प्रसिद्ध नाटक 'संगीत शाकुंतल' याचा पहिला प्रयोग सादर करण्यात आला.
१९२० – भारतातील सर्वात जुनी कामगार संघटना 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस' (इंटक)ची स्थापना.
१९६२ – संरक्षणमंत्री व्ही.के. कृष्णमेनन यांच्याकडून संरक्षण खाते काढून ते नेहरूंनी स्वत–कडे घेतले.
१९६६ – पंजाब प्रांताचे दोन भाग करून हरियाना व पंजाब अशी दोन राज्ये तयार करण्यात आली. चंदीगडला केंद्रशासित दर्जा मिळाला.
१९८४ – इंदिरा गांधी यांचा त्यांच्याच शीख अंगरक्षकाने पिस्तुलातून गोळ्या झाडून अंत केला.
२००६ – ॲडमिरल सुरेश मेहता यांनी भारतीय नौदल प्रमुखाचा पदभार सांभाळला.
२००७ – विजय माल्या प्रवर्तित किंगफिशर एयरलाइन्सने अभिनेत्री दीपिका पादुकोनला ब्रँड दूत म्हणून नियुक्त केले.
२००७ – चाथोली हम्जाने इंडोर आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या नव्या १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत जिंकण्यासह विक्रम नोंदवला तर सिनीमोल पॉलोसने महिला गटातले विजेतेपद जिंकले.

जन्म

१३४५ – फर्नांडो पहिला, पोर्तुगालचा राजा.
१३९१ – दुआर्ते, पोर्तुगालचा राजा.
१४२४ – व्लादिस्लॉस, पोलंडचा राजा.
१७०५ – पोप क्लेमेंट चौदावा.
१८३५ – एडॉल्फ फोन बेयर, जर्मन रसायनशास्त्रज्ञ.
१८७५ – सरदार वल्लभभाई पटेल, भारतीय स्वातंत्र्यसैनिक, उपपंतप्रधान.
१८८७ – च्यांग कै–शेक, चीनी नेता.
१८८७ – विल्यम व्हायसॉल, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१८९५ – सी. के. नायडू, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९२२ – नोरोदोम सिहोनुक, कम्बोडियाचा राजा.
१९३१ – डॅन रादर, अमेरिकन पत्रकार.
१९४६ – रामनाथ परकार, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९६१ – पीटर जॅक्सन, न्यूझीलँडचा चित्रपट दिग्दर्शक.

निधन

१४४८ – जॉन आठवा पॅलियोलोगस, बायझेन्टाईन सम्राट.
१७३२ – व्हिक्टर आमाद्युस दुसरा, सव्हॉयचा राजा.
१९८४ – इंदिरा गांधी, भारतीय पंतप्रधान.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894